शब्दांना सत्याची धार

# प्रहार



मांडवे येथे गोठ्याला भीषण आग; मोठे आर्थिक नुकसान

पान ३



लग्नसराईसाठी वऱ्हाडी मंडळींची एसटीलाच पसंती

पान ८

रत्नागिरी • सोमवार २७ एप्रिल, २०२६ RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३५१८० • वर्ष २२ • अंक १६८ • पाने ८ • ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in

# व्हाईट हाऊस हादरले ! डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यक्रमात गोळीबार







## हल्लेखोर उच्चशिक्षीत

**वॉशिंग्टन ( वृत्तसंस्था) :**

इराण आणि अमेरिका यांच्यातील तीव्र संघर्ष आणि तणावाच्या पार्श्वभूमीवर, शनिवारी रात्री वॉशिंग्टनमधील हिल्टन हॉटेलमध्ये झालेल्या वार्ताहर भोजन समारंभातील गोळीबाराच्या घटनेने जग हादरले आहे. या कार्यक्रमात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, पत्नी मेलानिया आणि उपराष्ट्रपती जेडी व्हान्स यांच्यासह अनेक मोठे अधिकारी उपस्थित होते. हल्लेखोराने हॉटेलच्या बॉलरूमबाहेर गोळीबार केला. ट्रम्प आणि पाहुणे बॉलरूममध्ये होते. हल्लेखोराला पकडण्यात आले असून अधीक चौकशी सुरु आहे.

## मेकॅनिकल इंजिनिअर, कॉम्प्युटर सायन्समध्ये मास्टर्स; सर्वोत्तम शिक्षक पुरस्कार विजेत्या व्यक्तीने केला गोळीबार

वॉशिंग्टनमधील हिल्टन हॉटेलमध्ये झालेल्या व्हाईट हाऊस कॉरस्पॉन्डंट्स डिनर दरम्यान गोळीबार करणाऱ्या संशयिताची ओळख पटली आहे. संशयिताचे नाव कोल थॉमस ॲलन आहे. ॲलन हा दक्षिण कॅलिफोर्नियाचा रहिवासी आहे. ट्रम्प आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हॉटेलमध्ये गोळीबार केल्यानंतर, ॲलनला सुरक्षा कर्मचाऱ्यांनी अटक केली. सीबीएस न्यूजच्या वृत्तानुसार, संशयिताने अधिकाऱ्यांसमोर कबूल केले की तो ट्रम्प प्रशासनातील अधिकाऱ्यांना लक्ष्य करत होता. त्याला २७ एप्रिलला न्यायालयात हजर केलं जाईल.

गोळीबारानंतर, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये एक पत्रकार परिषद घेतली, ज्यामध्ये त्यांनी सांगितले की संशयित मानसिकदृष्ट्या आजारी आहे. सुरक्षा यंत्रणांनी संशयिताच्या प्रोफाइलची चौकशी सुरू केली, ज्यात अनेक तपशील समोर आले. या तपासात ॲलनच्या पार्श्वभूमीबद्दल महत्त्वपूर्ण माहिती समोर आली आहे.

(पान २ वर)

व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांसोबत डोनाल्ड ट्रम्प यांच्या भोजनप्रसंगी गोळीबार झाल्यानंतर एका संशयिताला ताब्यात घेण्यात आलं आहे. शनिवारी (२५ एप्रिल) वॉशिंग्टन हिल्टनमधून गोळीबारासारखा आवाज आल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इतर सरकारी अधिकाऱ्यांना तातडीनं बाहेर काढण्यात आलं.

दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वतः ट्रूथ सोशलवर हल्लेखोराला अटक करण्यात आल्याची माहिती दिली.अकार्यक्रमातील एका सुरक्षा अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, सात ते आठ गोळ्या झाडण्यात आल्या.व्हाईट हाऊसमध्ये वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांसाठी डिनरचा कार्यक्रम ज्या ठिकाणी आयोजित

(पान २ वर)

## गोळीबारानंतर विविध देशातील प्रमुख नेत्यांनी व्यक्त केली चिंता

**लोकशाहीत हिंसाचाराला स्थान नाही: पंतप्रधान मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कॉरेस्पॉन्डंट्स डिनरमधील गोळीबाराच्या घटनेचा निषेध केला आहे. वॉशिंग्टन डीसी येथील एका हॉटेलमध्ये घडलेल्या सुरक्षा घटनेनंतर राष्ट्राध्यक्ष ट्रम्प, फर्स्ट लेडी आणि उपराष्ट्राध्यक्ष सुरक्षित असल्याचे समजल्याने दिलासा मिळाल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. मी त्यांच्या निरंतर सुरक्षिततेसाठी आणि कल्याणासाठी माझ्या शुभेच्छा देतो. लोकशाहीत हिंसाचाराला स्थान नाही आणि त्याचा अत्यंत स्पष्ट शब्दांत निषेध केला पाहिजे, असे पंतप्रधान मोदी म्हणाले.

**हिंसा हा कधीही मार्ग असू शकत नाही - शाइनबॉम**

राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि त्यांच्या पत्नी सुरक्षित आहेत हे ऐकून आनंद झाला. आम्ही त्यांना आदराने अभिवादन करतो. हिंसाचार हा कधीही मार्ग असू शकत नाही, असे मेक्सिकोच्या राष्ट्राध्यक्ष क्लॉडिया शाइनबॉम यांनी एक्स (X) वरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे.

लोकशाहीत राजकीय हिंसाचाराला स्थान नाही - कार्नी

आपला देश आणि अमेरिकेमधील वाढत्या तणावावर बारकाईने लक्ष ठेवून असलेले कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी म्हणाले की, डोनाल्ड ट्रम्प आणि जेवणाच्या वेळी उपस्थित असलेले इतर सर्वजण सुरक्षित असल्याने त्यांना दिलासा मिळाला आहे. कोणत्याही लोकशाहीत राजकीय हिंसाचाराला स्थान नाही आणि या चिंताजनक घटनेमुळे हादरलेल्या सर्वांसोबत माझ्या संवेदना आहेत, असे ते X वर म्हणाले.

**राजकीय हिंसाचार अजिबात स्वीकारार्ह नाही - मामदानी**

न्यूयॉर्क शहराचे महापौर झोहरान

(पान २ वर)

## वेचक

### राज्यात उष्णतेचा कहर

**मुंबई(प्रतिनिधी):** महाराष्ट्रात सध्या उन्हाचा प्रचंड तडाखा जाणवत असून राज्यभर तापमानाने अक्षरशः उच्चांक गाठला आहे. मराठवाडा, विदर्भासह अनेक भागांमध्ये उष्णतेचा पारा सातत्याने वाढत असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडत असून अनेक ठिकाणी अघोषित संचारबंदी असल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेषतः विदर्भातील अकोला शहरात या मोसमातील सर्वाधिक ४६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. हवामान विभागाने पुढील दोन दिवसांत तापमान आणखी वाढण्याचा अंदाज दिल्याने नागरिकांची चिंता वाढली आहे. परभणीत उष्माघातामुळे एका ३७ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. शिवाजी कांबळे असे त्याचे नाव असून दिवसभर उन्हात फिरल्यानंतर त्याला चक्कर आली आणि त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे आणि उष्णतेच्या तीव्रतेची गंभीरता अधोरेखित झाली आहे.

### अशोक खरातशी संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई-महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**नाशिक (प्रतिनिधी):** विकृत भोंदूबाबा अशोक खरात याचे राज्यभरातील अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांशी लागेबांधे असल्याची चर्चा सुरू असतानाच, आता त्याच्या संपर्कात असलेल्या आणि गैरव्यवहारात सामील असलेल्या अधिकाऱ्यांवर थेट बडतर्फीची कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट संकेत राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. या इशाऱ्यामुळे संबंधित विभागांतील संशयास्पद अधिकाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.

(पान २ वर)

### एच-१ बी व्हिसावर तीन वर्षांच्या बंदीची तयारी: विधेयक संसदेत सादर

**वॉशिंग्टन :** एच -१ बी व्हिसावर ३ वर्षांच्या बंदीची तयारी अमेरिकन सरकारने केली असून ट्रम्प यांच्या पक्षाच्या खासदारांकडून कठोर तरतुदी असलेले विधेयक संसदेत सादर केले आहे. नवीन एच-१बी व्हिसा देण्यावर पूर्णपणे ३ वर्षांसाठी बंदी घालण्याचा प्रस्ताव आहे. सध्याचा वार्षिक ६५ हजार व्हिसाचा कोटा कमी करून तो २५ हजारावर

(पान २ वर)

## जनगणनेत आता जनतेचाही सहभाग

**जनगणना जगातील सर्वात मोठी मोहीम; आतापर्यंत १ कोटी २० लाख घरांची नोंदणी**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'मधून दिली 'सेल्फ इन्युमरेशन'ची माहिती**

**नवी दिल्ली ( वृत्तसंस्था) :**

देशाचा विकास हा केवळ सरकारी योजनांपुरता मर्यादित नसून, तो जनसामान्यांच्या सक्रिय सहभागातूनच शक्य आहे, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'च्या १३३ व्या भागातून व्यक्त केला. आगामी 'डिजिटल जनगणना'च्या माध्यमातून नागरिकांचा सहभाग अधिक सुलभ करण्यावर भर देतानाच, पंतप्रधानांनी भारताच्या वाढत्या पवन ऊर्जेचा आणि बांबू क्रांतीचा गौरवपूर्ण उल्लेख केला. बुद्ध पौर्णिमेच्या शांती संदेशापासून ते कच्छच्या रणातील पर्यावरणाच्या जतनापर्यंत, विविध विषयांना स्पर्श करत पंतप्रधानांनी नव्या भारताच्या प्रगतीचा आलेख मांडला.

पंतप्रधानांनी सांगितले की, आपल्या देशात सध्या एक अत्यंत महत्त्वाचे अभियान सुरू आहे, ज्याबद्दल प्रत्येक भारतीयाला माहिती असणे आवश्यक आहे. हे आहे जनगणनेचे अभियान, ही जगातील सर्वात मोठी जनगणना आहे. जे साथीदार यापूर्वी अशा प्रक्रियेतून गेले आहेत, त्यांचा यावेळचा जनगणनेचा अनुभव वेगळा असणार आहे.ज्या राज्यांमध्ये स्व-गणनेचे काम पूर्ण झाले आहे, तिथे घरांच्या सूचीकरणाचे काम सुरू आहे. आतापर्यंत सुमारे १ कोटी २० लाख कुटुंबांच्या घरांच्या सूचीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.

जनगणनेत तुमचा सहभाग सोपा करण्यात आला आहेः तुम्ही स्वतःही तुमची माहिती नोंदवू शकता. कर्मचारी येण्यापूर्वी १५ दिवस

(पान २ वर)



### बुद्धांचा संदेश आजही महत्त्वाचा

यावेळी मे महिन्याची सुरुवात एका पवित्र प्रसंगाने होणार आहे. काही दिवसांतच आपण बुद्ध पौर्णिमा साजरी करणार आहोत. मी तुम्हा सर्व देशवासीयांना माझ्या आगाऊ शुभेच्छा देतो. भगवान गौतम बुद्धांचा जीवन संदेश आजही तितकाच प्रासंगिक आहे. त्यांनी आपल्याला शिकवले आहे की शांती आपल्या आतून सुरू होते, त्यांनी सांगितले आहे की स्वतःवर विजय मिळवणे हा सर्वात मोठा विजय असतो.

## देवरूख-रत्नागिरी मार्गावरील पांगरी येथे दुचाकीचा भीषण अपघात

### हातखंबा येथील दोन तरूणांचा दुर्दैवी मृत्यू; एकजण गंभीर जखमी

**देवरूख येथून लग्नसोहळा आटपून घरी परतत असताना काळाने घातला घाला**

**निलेश जाधव / देवरूख**

देवरूख येथून लग्नसोहळा आटपून रविवारी दुपारी दुचाकीवरून हातखंबा बौद्धवाडीतील तिघेजण घरी परतत असताना देवरूख-रत्नागिरी मार्गावरील पांगरी येथील एका अवघड वळणावर दुचाकीचा भीषण अपघात झाला. या भीषण अपघातात दोन तरूणांचा मृत्यू झाला आहे तर अन्य एकजण गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर रत्नागिरीतील जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचार सुरू आहेत. हा अपघात रविवारी सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास घडला.

या भीषण अपघातात विकास काशिराम कांबळे (वय ३८), सुमित विलास कांबळे (वय ३५) या दोन तरूणांचा दुर्दैवी मृत्यू

(पान २ वर)



## फेसबुकवरील ओळख पडली महाग; तरुणीने मित्राच्या सहाय्याने घातला २७ लाख रूपयांचा ऑनलाईन गंडा

### गुहागर येथे नोकरीनिमित्त राहणाऱ्या हरियाणा येथील प्रौढाची फसवणूक

**गुहागर (प्रतिनिधी) :**

सोशल मीडिया फेसबुकवर ओळख वाढवून क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडून तरुणीने आपल्या मित्राच्या मदतीने गुहागर येथे नोकरी निमित्त आलेल्या हरियाणा येथील प्रौढाची तब्बल २७ लाख रुपयांची ऑनलाईन फसवणूक केली. फसवणुकीची ही घटना २६ मार्च २०२६ ते १६ एप्रिल २०२६ या कालावधीत तवसाळ-गुहागर येथे घडली आहे.

याप्रकरणी गुहागर पोलीस ठाण्यात दोन संशयितांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आदिती शर्मा आणि अंकित शर्मा अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. त्यांच्या विरोधात विनय कुमार सिन्हा

(पान २ वर)

## इस्लामाबाद शांतता चर्चा पुन्हा अनिर्णित!

### इराणचे परराष्ट्र मंत्री चर्चेविना परतले, अमेरिकेने पाकिस्तान दौरा केला रद्द

**इस्लामाबाद :**

इराण आणि अमेरिका यांच्यातील वाढता तणाव कमी करण्यासाठी पाकिस्तानने पुढाकार घेतलेल्या मध्यस्थीच्या प्रयत्नांना मोठा धक्का

(पान २ वर)

## एसटीचा कायापालट; आता चालकच करणार प्रवाशांचे स्वागत

### १ मे पासून 'आपली बस, आपली सेवा' मोहिमेस प्रारंभ

**एसटी महामंडळाकडून 'मिशन मॉडेल' कार्यान्वित!**

**मुंबई ( प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळ अर्थात एसटी महामंडळाने प्रवाशांचा विश्वास परत मिळवण्यासाठी 'आपली बस, आपली सेवा' ही नवी मोहीम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या उपक्रमाची घोषणा केली. १ मे २०२६ पासून ही मोहीम संपूर्ण राज्यात राबवली जाणार आहे.

महामंडळाकडे गाड्यांची संख्या वाढत असली तरी अपेक्षेप्रमाणे प्रवासी आणि उत्पन्न वाढत नसल्याचे लक्षात आले. त्यामुळे सेवा

(पान २ वर)

## आडिवरे येथे शिक्षकाने केला महिलेवर अत्याचार

### राजापूर तालुक्यात शिक्षण क्षेत्राला काळीमा फासणारी घटना

**अवघ्या काही तासातच नाटे पोलिसांकडून नराधम शिक्षकाला अटक**

**जैतापूर (वार्ताहर)**

राजापूर तालुक्यातील आडिवरे येथे एका शिक्षकानेच महिलेवर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. स्थानिक हायस्कूलमध्ये काम करणाऱ्या या शिक्षकाने महिलेवर अशा प्रकारे अत्याचार केल्याचे उघड झाल्याने या परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी त्या पीडित महिलेच्या तक्रारीवरून नाटे सागरी पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला असून नाटे पोलिसांनी अवघ्या काही तासातच त्या नराधम शिक्षकाच्या मुसक्या आवळल्या आहेत. या प्रकाराने या परिसरात संतापाची लाट उसळली आहे.

या प्रकरणी पोलिसांनी माहिती दिली आहे. रामनाथ नारायण वाकडे असे या नराधम शिक्षकाचे नाव असून तो याच परिसरातील एका नामांकित हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत आहे. समाजात आदराचे स्थान असलेल्या शिक्षकानेच अशा प्रकारचे विकृत कृत्य केल्यामुळे शिक्षण क्षेत्राला काळीमा फासला गेला आहे.

पीडित महिला २० आणि २१ एप्रिल रोजी परिसरातील एका काजूच्या बागेत कुंपणासाठी खड्डे खोदण्याचे काम करत होती. यावेळी

(पान २ वर)

## रत्नागिरीत प्रतिबंधित गुटखा-पान मसाल्यावर शहर पोलिसांनी केली धडक कारवाई; ६ लाख ७७ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त

**रत्नागिरी (वार्ताहर):**

रत्नागिरी शहरात प्रतिबंधित गुटखा व पान मसाला विक्रीसाठी येणाऱ्या व्यक्तीर रत्नागिरी शहर पोलिसांनी पहाटेच्या सुमारास धडक कारवाई करत मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत एकूण ६ लाख ७७ हजार ९०४ रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

पोलिसांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली होती की, कोल्हापूर येथून एक व्यक्ती मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा व पान मसाला विक्रीसाठी रत्नागिरी शहरात येणार आहे.

(पान २ वर)



## खेडमध्ये कुवार साई परिसरात भीषण वणवा

### अग्निशमन दलाच्या तत्परतेने मोठी दुर्घटना टळली

**खेड (प्रतिनिधी)**

खेड शहरातील कुवार साई परिसरात २५ एप्रिल रोजी दुपारी २:१५ वाजण्याच्या सुमारास मोठ्या प्रमाणात वणवा लागल्याची घटना घडली. आग वेगाने पसरत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. विशेषतः ही आग जवळील घरांच्या दिशेने सरकत असल्याने रहिवाशांमध्ये मोठी घबराट पसरली होती.

या घटनेची माहिती स्थानिक नागरिकांनी तत्काळ भाजप नेते ॲड. वैभव खेडेकर यांना फोनद्वारे दिली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत ॲड. वैभव खेडेकर यांनी तत्काळ खेड नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली आणि त्वरित मदत

(पान २ वर)



## 'कोकणचा राजा'वर अस्मानी संकट!

### कडक उन्हाच्या तडाख्यासह अवकाळी पावसाचाही फटका, हापूसचे दर कोसळले, बागायतदार हवालदिल

**रत्नागिरी (वार्ताहर)**

रत्नागिरीचा अभिमान मानल्या जाणाऱ्या 'हापूस' आंब्याला सध्या निसर्गाच्या लहरीपणाचा मोठा फटका सहन करत आहे. एकीकडे कडक उन्हामुळे तापमानाचा पारा ३५ अंशांच्या पुढे गेल्याने आंब्याच्या बागा अक्षरशः होरपळत आहेत, तर दुसरीकडे अवकाळी पावसाच्या सावटाने बागायतदारांची झोप उडाली आहे. अशा दुहेरी संकटामुळे आंब्याच्या उत्पादनावर आणि गुणवत्तेवर परिणाम झाला असून, बाजारात कोकणचा राजा हापूसची मोठी घसरण झाली आहे.

कधी काळी १५०० ते २००० रुपये डझनने विकला जाणारा मध्यम आकाराचा हापूस आंबा आता थेट ५०० रुपयांपर्यंत घसरला आहे. मोठ्या आकाराच्या हापूसचा दरही १००० ते १२०० रुपयांदरम्यान आला आहे. ग्राहकांसाठी ही जणू सुवर्णसंधी ठरत असली, तरी कोकणच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या बागायतदारांवर मात्र आर्थिक संकट कोसळले आहे. स्थानिक बाजारपेठेत हापूसची आवक मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र, बदलत्या हवामानामुळे फळ खराब होण्याची भीती असल्याने बागायतदारांना मिळेल त्या भावात माल विकावा लागत आहे. परिणामी, उत्पादन खर्चही निघत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत.

**निर्यातीवरही परिणाम होण्याची भीती**

रत्नागिरी हापूसला आखाती देश आणि युरोपमध्ये मोठी मागणी आहे. मात्र, पावसामुळे फळावर डाग पडल्यास किंवा गुणवत्ता घसरल्यास निर्यातीवर मोठा परिणाम होतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत 'रत्नागिरी हापूस'ची ब्रँड व्हॅल्यू टिकवणे हे मोठे आव्हान

(पान २ वर)

